09-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 08-06-2025 22:39 Page 1



## निवडक

### चिखलीत 'कॅरिंग कॅपॅसिटी' समिती स्थापन

**– चिखली पंचायतीचा राज्यातील पाहिलाच प्रयोग**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ८ :** गोव्यात ग्रामपातळीवर पहिल्यांदाच, चिखली ग्रामपंचायतीने चिखली , दाबोळी आणि सांत जसिंत या क्षेत्रांतील विकास मर्यादा आणि संसाधन क्षमतेचा अभ्यास करण्यासाठी 'क्षमता वहन क्षमता समिती' स्थापन केली आहे. गावात कोणता आणि किती विकास परवडेल, याचे मूल्यांकन करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा आणि दूरदृष्टीचा निर्णय मानला जात आहे.

सरपंच कमला प्रसाद यादव यांच्या नेतृत्वाखाली ही समिती कार्यरत झाली असून, प्रत्येक प्रभागातील नामनिर्देशित सदस्य तसेच सर्व निवडून आलेले प्रतिनिधी यांचा समावेश या समितीत करण्यात आला आहे. समितीला गावाच्या नैसर्गिक संसाधनांवर आणि पायाभूत सुविधांवर ताण न देता, शाश्वत विकासासाठी मूल्यांकन चौकट तयार करण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

या उपक्रमाचा निर्णय १३ एप्रिल रोजी झालेल्या ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला होता. भविष्यातील कोणत्याही विकास प्रकल्पाला मंजुरी देण्यापूर्वी पर्यावरणीय, पायाभूत आणि सामाजिक मर्यादांचा विचार करणे अत्यावश्यक आहे, यावर या ठरावात भर देण्यात आला होता. यासंदर्भात समितीची पहिली बैठक याच आठवड्यात पार पडली, ज्यामध्ये क्षमता वहन मूल्यांकन कसे करायचे, कोणते निकष विचारात घ्यायचे, यावर प्राथमिक चर्चा करण्यात आली. राज्यात अनेक गावांमध्ये अनियंत्रित बांधकामामुळे पाणीपुरवठा, वीज, कचरा व्यवस्थापन आणि वाहतुकीसारख्या मूलभूत सेवांवर ताण वाढला आहे. त्यामुळे चिखली पंचायतीचे हे पुढाकारात्मक पाऊल इतर ग्रामपंचायतींसाठी दिशादर्शक ठरू शकते, असे स्थानिक पर्यावरण कार्यकर्ते आणि नागरी संघटनांचे मत आहे. हा उपक्रम स्थानिक प्रशासन आणि नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करून विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो.

# 'कुणी नेटवर्क देता का नेटवर्क?'

## दुर्गम साकोर्डा गावात अपुऱ्या डिजिटल सुविधांमुळे ग्रामस्थ हैराण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साकोर्डा (देऊळवाडा), दि. ८ :** 'डिजिटल इंडिया'च्या स्वप्नातून ग्रामीण भागाला सामावून घेण्यासाठी सरकार प्रयत्नशील असले तरी साकोर्डा गावातील देऊळवाडा परिसरातील नागरिक अजूनही मूलभूत डिजिटल सुविधांपासून वंचित आहेत. वीज खंडित होण्याचे वारंवार प्रकार, अपुऱ्या नेटवर्क सुविधा आणि असमाधानकारक पाणीपुरवठा या त्रासदायक समस्यांमुळे येथील ग्रामस्थांना शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक व्यवहारांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गावकरी सरकारच्या डिजिटलायझेशन मोहिमेचे स्वागत करत असले तरी प्रत्यक्षात मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याचे ते नमूद करतात. सरकारने 'डिजिटल इंडिया'साठी अनेक योजना राबवल्या, मात्र आमच्यासाठी त्या केवळ घोषणाच राहिल्या आहेत, असे स्थानिक रहिवासी बिपिन नाईक यांनी सांगितले.

नाईक म्हणाले, साकोर्डा हे सावर्डे मतदारसंघातील एक दुर्गम गाव आहे. येथे बीएसएनएल व्यतिरिक्त कोणतेही नेटवर्क नाही. त्यातही वीज गेली की नेटवर्क पूर्णपणे बंद पडते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास, बँक व्यवहार, रेशन किंवा गॅस बुकिंगसारख्या मूलभूत गरजांमध्ये अडथळे येतात. काही कुटुंबांनी वायफाय घेतला आहे, पण वीज गेल्यावर त्याचाही उपयोग राहत नाही.

स्थानिक प्रदीप वेरेंकर यांनी सांगितले की, त्यांच्या मुलीला ' नीट ' परीक्षेची तयारीसाठी ऑनलाइन क्लासेस लावावे लागत आहेत, पण सतत नेटवर्क अडचणीमुळे अभ्यासात व्यत्यय येतो. वाईट



परिस्थिती अशी आहे की, आम्हाला डोंगराच्या माथ्यावर जावं लागतं. तिथे दोन-दोन तास थांबून कनेक्टिव्हिटी मिळवतो. मुलगी आणि मी मिळून अभ्यासासाठी हे करत असतो पण हे किती काळ शक्य आहे? असे त्यांनी विचारले.

वेरेकर यांनी आणखी नमूद केले की, सरकारच्या डिजिटल योजनेचा लाभ घेण्यासाठी आम्हाला जीव तोड मेहनत करावी लागते. १०८ रुग्णवाहिकेपासून ते रेशन बुकिंगपर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी नेटवर्क आवश्यक आहे, पण आमच्यासाठी ही एक दिवास्वप्नासारखी बाब झाली आहे.

ग्रामपंचायत सदस्या गायत्री मापारी यांनी सांगितले की, देऊळवाड्यातील सुमारे ६० घरांतील रहिवाशांना गेल्या काही वर्षांपासून सतत या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पूर्वी इतका त्रास नव्हता, पण डिजिटल व्यवहार अनिवार्य झाल्यावर मोबाइल नेटवर्कच नसेल तर आम्ही काय करायचे? त्यांनी पुढे सांगितले की, बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांशी तक्रार करूनही समस्या कायम आहे. दोन-तीन दिवस नेटवर्क पूर्णपणे बंद राहतं. विद्यार्थी वर्गाचे मोठे नुकसान होते. अभ्यासासाठी मुलांना टेकडी चढून जावे लागते, जे त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही धोकादायक आहे.

स्थानिकांच्या मते, अनेक कुटुंबे चांगल्या नेटवर्क आणि शिक्षणाच्या सोयीसाठी शहरांत स्थलांतर करत आहेत. जर अशीच परिस्थिती राहिली, तर काही वर्षांत गाव ओसाड होईल' अशी भीती बिपिन नाईक यांनी व्यक्त केली. बीएसएनएल सेवा अपयशी ठरत असेल, तर खासगी सेवा पुरवठादारांना परवानगी द्यावी, अशी त्यांनी मागणी केली. साकोर्डा परिसरातील नागरिकांनी सरकारकडे मागणी केली आहे की, त्यांनी त्वरित वीज पुरवठा आणि मोबाईल नेटवर्कच्या समस्या सोडवाव्यात. डिजिटल इंडिया'च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी दुर्गम ग्रामीण भागातही समान संधी उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कोलवा समुद्रकिनाऱ्यावर गंजलेले विजेचे खांब कोसळले

▶ **पर्यटक व स्थानिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ८ :** राज्यातील एक महत्त्वाचे आणि नेहमीच पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाणारे कोलवा समुद्रकिनारा सध्या सुरक्षिततेच्या गंभीर समस्येला सामोरे जात आहे. गंजलेल्या आणि जर्जर अवस्थेत असलेल्या विजेच्या खांबांपैकी अनेक खांब अलीकडच्या काळात कोसळले असून, स्थानिकांनी पर्यटन विभागाच्या निष्काळजीपणावर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

प्रत्यक्षदर्शी आणि स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही आठवड्यांत किमान सात ते आठ विजेचे खांब जमीनदोस्त झाले आहेत. याशिवाय, आणखी काही खांब कधीही कोसळू शकतात, असेही निरीक्षण नोंदवले गेले आहे. यामुळे परिसरातील नागरिक आणि पर्यटक दोघेही धास्तावले आहेत.

जखमी होणे किंवा जीवितहानी होणे, ही केवळ वेळेची वाट पाहत असलेली दुर्घटना आहे, अशी प्रतिक्रिया एका स्थानिक रहिवाशाने दिली. रस्त्यालगत आणि किनाऱ्याजवळ उभारण्यात आलेले हे विजेचे खांब समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यशास्त्रासाठी नव्हे तर रात्रीच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे मानले जातात. मात्र कोसळलेल्या खांबांमुळे किनाऱ्याच्या मोठ्या भागात रात्रीच्या वेळेस अंधार पसरतो, त्यामुळे पादचाऱ्यांची व पर्यटकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. सामुदायिक कार्यकर्ते जोस फर्नांडिस यांनी सांगितले की, हे फक्त सौंदर्य किंवा सोयीचा विषय नाही . ही थेट जीवित सुरक्षेशी संबंधित समस्या आहे. पर्यटन विभागाने केवळ जबाबदारी टाळत बसू नये, तर तातडीने उपाययोजना करावी.

स्थानिकांनी असा आरोप केला आहे की, खराब अवस्थेतील पायाभूत सुविधांविषयी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. नित्यनियमित देखभाल न केल्यामुळेच हे संकट उद्भवले असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. काही रहिवाशांनी तर खांबांचे तांत्रिक ऑडिट करून गंजलेले खांब तातडीने बदलण्याची मागणी केली आहे.

# आर्लेम-नुवे बायपासवर स्ट्रीटलाइट्सची तातडीने गरज

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ८ :** आर्लेम-नुवे बायपासवर शुक्रवारी पहाटे झालेल्या गंभीर अपघातानंतर या मार्गावर त्वरित स्ट्रीटलाइट्स बसवावेत, अशी नागरिकांची मागणी पुन्हा एकदा तीव्र झाली आहे. अपुऱ्या प्रकाशव्यवस्थेमुळे अपघातप्रवण बनलेल्या या रस्त्याची परिस्थिती सुधारण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने पुढाकार घ्यावा, असे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

हा बायपास मार्ग दक्षिण गोव्यातील आर्लेम आणि नुवे या प्रमुख जंक्शनना जोडतो. सुमारे पाच किलोमीटर लांबीचा हा रस्ता रात्रीच्या वेळेस पूर्णतः अंधारात बुडतो, यामुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. शुक्रवारी पहाटे तीनच्या सुमारास या रस्त्यावर एका वाहनाचा अपघात होऊन चालक जखमी झाला.



हा अपघात टाळता आला असता. आम्ही अनेक वर्षांपासून येथे दिवे बसवण्याची मागणी करत आहोत. आणखी किती अपघात व्हायला हवेत की प्रशासन जागं होईल ? असा सवाल घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक रहिवासी सिद्धेश भगत यांनी उपस्थित केला.

दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणाऱ्या या मार्गावर व्यावसायिक वाहने, दुचाकी, चारचाकी आणि सार्वजनिक वाहतूकही सतत सुरू असते. मात्र, रस्त्याची सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून, अपघाताच्या घटनांत सातत्याने वाढ होत आहे. विशेषतः संध्याकाळनंतर आणि पहाटेच्या वेळी चालकांना अत्यंत अडचणींना सामोरे जावे लागते. गेल्या काही वर्षांत स्थानिक रहिवाशांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या असून, याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना वेळोवेळी निवेदन देण्यात आले, तसेच शांततापूर्ण आंदोलनांचाही आधार घेण्यात आला. मात्र, आजवर ठोस कारवाई झालेली नाही. सध्या नागरिकांनी पुन्हा एकदा या रस्त्यावर प्रकाशयोजना तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. अपघात थांबवायचे असतील, तर हे एक अत्यावश्यक पाऊल असल्याचे ते म्हणाले. सततच्या अपघातांनंतरही प्रशासनाचे दुर्लक्ष निंदनीय आहे. स्ट्रीटलाइट्ससारख्या मूलभूत सुविधेची मागणी हा केवळ सोयीचा प्रश्न नाही, तर नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा आहे.सदर अपघाताच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक यंत्रणांनी संयुक्तपणे तात्काळ उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.


